VOL- XII ISSUE- II FEBRUARY 2025 PEER REVIEW e-JOURNAL IMPACT FACTOR 8.379 ISSN 2349-638x

# छत्रपती शाहू महाराजांचे शैक्षणिक विचार

**प्रा. डॉ. कोतमे धिरजकुमार सत्येकाल**
मराठी विभाग प्रमुख,
जयक्रांती कला वरिष्ठ महाविद्यालय, लातूर
Email Id - dhriaj.kotme24@gmail.com

लोककल्याणाची जाण असणारा दूरगामी विकासाचा पुरस्कर्ता, पुरोगामी विचाराची कास धरून धोरणात्मक निर्णय घेणारा लोक राजा म्हणजेच राजर्षी शाहू महाराज होत. ब्रिटिशांच्या साम्राज्यवादी धोरणाच्या काळात व आपल्या देशाच्या पारतंत्र्याच्या काळात त्यांनी आपले संस्थान लोकशाही पद्धतीने चालवले. राजर्षी शाहू महाराज एक अत्यंत दूरदृष्टीचे राजे होते, त्यांनी केलेल्या कार्यामुळे कोल्हापूर संस्थानला देशपातळीवर नावलौकिक प्राप्त झालेला आहे. सर्वसामान्य जनतेच्या कल्याणाचा, हिताचा नेहमी विचार करणारे आणि त्यासाठी वेगवेगळ्या योजना राबवून त्या प्रत्यक्षात आणण्यासाठी प्रयत्नाची पराकाष्ठा करणारे लोककल्याणकारी राजे म्हणून त्यांनी कार्य केलेले आहे. राजर्षी शाहू महाराजांनी आपल्या संस्थानाचा वापर आपल्या प्रजेच्या कल्याणासाठी केलेला आहे. त्यातूनच त्यांनी आपल्या संस्थांमध्ये लोककल्याणकारी विकासाची सामाजिक न्याय प्रस्थापनेचे अतिशय महत्त्वपूर्ण कार्य केलेले आहे.

राजर्षी शाहू महाराजांनी त्यांच्या 28 वर्षांच्या कार्यकाळात त्यांच्या दूरदृष्टीने व धोरणाने अनेक कार्य पूर्ण केलेले आहेत. त्या कामाला आजच्या काळातही तोड नाही इतकी ती महत्त्वपूर्ण आहेत. त्यांनी काळाच्या पुढे जाऊन जे कार्य केलेले आहे ते कार्य 106 वर्षांनंतरही महत्त्वपूर्ण ठरते. त्यांचे कार्य आजच्या काळातही प्रेरणादायी ठरते. शाहू महाराजांनी दलित, कष्टकरी, गरीब, वंचित या घटकासाठी अनेक प्रकारचे धोरणात्मक निर्णय घेतलेले आहेत. सुमारे 100 वर्षांपूर्वी आपल्या संस्थानात मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा कायदा करून त्याची अतिशय प्रभावीपणे अंमलबजावणी करून बहुजन समाजाच्या व दलित घटकांच्या शिक्षणाची सुरुवात शाहू महाराजांनी करून दिलेली आहे. त्यासाठी त्यांनी कायद्यात कठोर तरतुदी केल्या. त्या त्या काळात व्यापक समाजाचा होत्या. त्यांनी केलेल्या या असामान्य कार्यामुळे शिक्षणाचा प्रवाह या भागात निर्माण झाला. त्यामध्ये वाढ करून त्यांनी ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना वस्तीगृहाची सुविधा निर्माण करून दिली त्यामुळेच राजर्षी शाहू महाराजांना महान सुधारक समजले जाते. त्यांनी केलेल्या कार्यामुळे दलित आदिवासी आणि मागासलेल्या घटकाला शिक्षणाचा मार्ग सापडला. शाहू महाराजांनी आपल्या शैक्षणिक, सामाजिक, आर्थिक आणि अस्पृश्य विषयक कामाच्या माध्यमातून बहुजन समाजाला जागृत करून त्यांची सर्वांगीण प्रगती घडवून आणली.

**शैक्षणिक विचार:**

राजर्षी शाहू महाराजांनी त्या काळामध्ये बहुजन समाजाची शिक्षणाच्या अभावाने झालेली परिस्थिती लक्षात घेऊन त्यांनी या समाजाला सक्तीचे मोफत शिक्षण देण्याचा विचार केला. शिक्षणाचे महत्त्व त्या काळात महाराजांनी ओळखले होते. त्यामुळेच त्यांनी खामगाव येथील भाषणात आपले विचार मांडले.' शिक्षणानेच आमचा तरुणोपाय आहे असे विचार मांडले. शिक्षणाशिवाय कोणत्याही देशाची उन्नती झाली नाही हा विचार त्यांनी सांगितला. अज्ञानात बुडालेल्या देशात चांगले मुत्सद्दी व लढवय्ये वीर कधीच निर्माण होणार नाहीत. म्हणूनच सक्तीच्या व मोफत शिक्षणाची आपल्या देशाला गरज असल्याचे त्यांनी सांगितले. नाशिक येथील भाषणामध्ये ही त्यांनी आपले शिक्षण विषयक विचार स्पष्ट केले आहेत. रयतेतील थोडासा भाग पूर्ण सुशिक्षित होण्यापेक्षा सर्व जनतेला प्राथमिक शिक्षणाचा थोडासा अंश मिळाला पाहिजे हा त्यांचा विचार होता. त्यांना शिक्षणाच्या विषयीची तळमळ होती.

**शैक्षणिक कार्य:**

राजर्षी शाहू महाराजांचे कार्य हे फक्त त्यांच्या कोल्हापूर संस्थानाच्याच नाही तर संपूर्ण महाराष्ट्राच्या

शिक्षणाला कलाटणी देणारे ठरले. छत्रपती शाहू महाराजांनी ध्येयवादी दृष्टिकोनातून व नियोजन पूर्वक सर्वांगीण सुधारणामुळे कोल्हापूर संस्थानातील जनतेच्या जीवनावर दूरगामी झालेले दिसून येतात. महात्मा ज्योतिबा फुले यांचा वारसा पुढे चालवला. बहुजन समाज शिक्षित झाल्याशिवाय त्यांना मानाचे स्थान मिळणार नाही हे ओळखले. त्यामुळे बहुजन समाजाचा शिक्षणातून उद्धार त्यांना घडविलेला दिसून येतो. शिक्षणावरील उच्चवर्णीयांची मक्तेदारी मोडून काढण्यासाठी शिक्षणाचा प्रवाह बहुजन समाजापर्यंत पोहोचविण्याचे अतिशय महत्त्वाचे कार्य शाहू महाराजांनी केले.

छत्रपती शाहू महाराजांनी कार्याला सुरुवात केली त्यावेळी बहुजन समाजात 10 वी झालेल्यांची संख्या अल्प स्वरूपात होती. ग्रामीण भागामध्ये प्राथमिक शाळा नव्हत्या, सर्वसामान्य समाज अज्ञानामध्ये व अंधश्रद्धेमध्ये जीवन जगत होता त्या काळात शिक्षण घेणे हे उच्चवर्णीयांचे कार्य होते. ज्ञानाच्या क्षेत्रात उच्चवर्णीयांची मक्तेदारी मोडून इंग्रजांनी सर्व जाती धर्मासाठी खुली केली पण शिक्षणाची परंपरा नसल्यामुळे बहुजन समाजाला या संधीचा फायदा घेता आला नाही. छत्रपती शाहू महाराजांनी अशा बहुजन वर्गात शैक्षणिक चळवळ सुरू करण्याचा ध्यास घेतला होता. 18 जुलै 1902 रोजी छत्रपती शाहू महाराजांनी बहुजन समाजाच्या शैक्षणिक उन्नतीसाठी अभुतपूर्व असा जाहीरनामा प्रसिद्ध केला आहे. कोल्हापूर संस्थानांमध्ये सर्व वर्णाच्या लोकांना शिक्षण देण्याबद्दल व त्यास उत्तेजन देण्याबद्दल प्रयत्न केले आहेत. परंतु सरकारच्या इच्छेप्रमाणे मागासलेल्या लोकांच्या स्थितीत फारसे यश न मिळाल्यामुळे त्यांनी जाहीरनामाच्या माध्यमातून बहुजन समाजाला स्त्रियांना सुशिक्षित करण्यासाठी प्राथमिक शिक्षणापासून उच्च शिक्षणापर्यंत सोय उपलब्ध करण्याचे धोरण त्यांनी आखले बहुजन समाजाच्या शैक्षणिक प्रगतीत येणाऱ्या सर्व अडचणीवर मात करण्याचे त्यांनी ठरवले होते.

राजर्षी शाहू महाराजांनी शिक्षण विषयी सर्वांगीण दृष्टिकोन अंगीकारलेला होता. शिक्षण देऊन सोयी सवलती उपलब्ध करून देणे एवढाच त्यांचा दृष्टिकोन मर्यादित नव्हता तर जनसामान्याच्या मनात शिक्षणासंबंधीची अभुतपूर्व लालसा रुजविण्याचा त्यांचा प्रयत्न होता.

**सक्तीचे मोफत शिक्षण :**

बहुजन समाजाचा शेती हा प्रमुख व्यवसाय होता. लहान मुलांपासून माणसांपर्यंत सर्वजण शेतीतच काम करत होते. काबड कष्ट करणे एवढेच त्यांना माहीत होते. त्यांच्यातील अज्ञानामुळे बहुजन समाजातला शिक्षणाचे महत्त्व समजलेलेच नव्हते. त्यामुळे महाराजांनी सक्तीच्या शिक्षणाचे धोरण आखले. या शाळा चालू करण्यासाठी सार्वजनिक इमारतीचा उपयोग कसा करता येईल याची माहिती गोळा करून ग्रामीण भागात शाळा सुरू करण्याचे आदेश दिले. आजच्या राज्यकर्त्याप्रमाणे शाळा, महाविद्यालय काढून त्यांनी देवस्थानाच्या उत्पन्नातून त्याचा खर्च वजा करून राहिलेले उत्पन्न शाळेला द्यावे असे ठरविले, त्यामधूनच शाळेच्या इमारतीचा व शिक्षकाच्या पगाराचा प्रश्न सोडविला. शाहू महाराजांनी शाळाची सुरुवात करत असताना प्रत्येक घटकाचा विचार करून कोणाचीही गैरसोय होऊ दिली नाही. त्यांनी प्राथमिक शाळेत फी माफीची घोषणा केली. त्यांनी कोल्हापूर संस्थानात प्राथमिक शिक्षण सक्तीचे केले महाराजांनी त्यांच्या संस्थानात राखीव जागेसंबंधीच्या कायदा केला.

छत्रपती शाहू महाराजांना सक्तीच्या शिक्षणातून बहुजन समाजाला समानतेच्या पातळीवर आणावयाचे होते. लहान वयात योग्य ते संस्कार केले तरच त्यांच्या जीवनात चांगला फायदा होतो म्हणून बालवयात शिक्षण मिळाले पाहिजे अशी महाराजांची विचारसरणी होती. कर्तव्य संपन्न मनुष्य उच्च पदावर जाऊ शकतो, परंतु या कर्तव्यास वाव मिळाला नाही तर ते कर्तृत्व कुजुन जाण्याची शक्यता असते. शाहू महाराजांनी समाजाला कर्तृत्व आजमावण्याची संधी प्राप्त करून दिली. मोफत सक्तीच्या शिक्षण कायदा केला. तरीही अस्पृश्यांना इतर समाजापेक्षा वेगळी वागणूक दिली जात आहे असे त्यांच्या लक्षात आल्यावर त्यांनी वटहुकूम काढला.

राजर्षी शाहू महाराजांच्या सक्तीच्या व मोफत योजनेमुळे शिक्षणाच्या प्रसाराला विस्तृत स्वरूप प्राप्त झाले. शाळा व विद्यार्थी संख्या वाढली. शाहू महाराजांनी शिक्षण क्षेत्रातील या योजनांचा स्वीकार करताना त्यावर सर्व बाजूंचा विचार केला त्यातून शाळांची निर्मिती, देखभाल, उत्पन्न, खर्च, शिक्षकाची नेमणूक इत्यादी व्यवस्था लावली.

**व्यावसायिक शिक्षण :**

छत्रपती शाहू महाराजांनी व्यावसायिक शिक्षणालाही अधिक महत्त्व दिले होते. गावगाडा व्यवस्थित चालवण्यासाठी त्यांनी पाटील स्कूल व तलाठी स्कूल सुरू केले या शाळेतून पाटील व तलाठ्यांना सर्वसाधारण जमा

खर्च, कायदे, शांतता, सुव्यवस्था, महसूल विषयक दक्षता इत्यादी विषयाचे शिक्षण दिले. शैक्षणिक प्रगती मध्ये शिक्षक हा महत्त्वाचा घटक असल्याने शिक्षकांसाठी प्रशिक्षण केंद्र सुरू केले. तांत्रिक शिक्षणाची समाजाला आवड निर्माण व्हावी म्हणून त्यांनी प्रयत्न केले. शेती, उद्योग आणि सेवा या तीनही क्षेत्राकडे पायाभूत शिक्षणाची व्यवस्था निर्माण करण्याकडे महाराजांचा कल होता. शेतीच्या सुधारित तंत्राचे ज्ञान शेतकऱ्यांना मिळण्यासाठी त्यांनी किंग एडवर्ड एग्रीकल्चरल इन्स्टिट्यूट उभी केली. त्यामध्ये शेतीच्या आधुनिक पद्धती, बियाणे, रासायनिक खते त्याचप्रमाणे समाजातील इतर क्षेत्राला अभियांत्रिकी धातू काम तंत्रज्ञान यासाठी जयसिंगराव घाटगे टेक्निकल इन्स्टिट्यूट ची स्थापना केली. औद्योगिक क्षेत्रातील कामगारांच्या प्रशिक्षणासाठी त्यांनी राजाराम इंडस्ट्रीज स्कूलची स्थापना केली. लष्करी शिक्षण देणारे इन्फंट्री स्कूल सुरू केले या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये व्यायाम व लष्करी शिक्षणाची आवड निर्माण केली. या वेगवेगळ्या संस्थांच्या माध्यमातून बहुजन समाजाला वेगवेगळ्या शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून दिल्या आहेत.

**स्त्री शिक्षणासाठी प्रयत्न :**

राजर्षी शाहू महाराजांनी त्यांच्या संस्थानात स्त्री शिक्षणासाठी अतिशय पुरोगामी धोरण स्वीकारले होते. स्त्री शिक्षणाची व्यवस्था पाहण्यासाठी त्यांनी स्त्री शिक्षणाधिकाऱ्यांचे विशेष पद निर्माण केली. त्यांच्या संस्थानांमध्ये मुला मुलींच्या शाळा होत्या पण त्यांनी मुलींसाठी स्वतंत्र शाळा काढल्या. पास होणाऱ्या मुलींना बक्षीस दिले. प्रौढ व मागासवर्गातील स्त्रियांसाठी त्यांनी आदेश काढून शिकणाऱ्या स्त्रियांसाठी राहण्या व जेवणाची व्यवस्था केली हुशार मुलींना पुढील शिक्षणासाठी प्रोत्साहन देऊन शिष्यवृत्ती दिल्या.

महाराजांनी मुलींच्या उच्चशिक्षणाच्या बाबतीत उदार दृष्टिकोन ठेवलेला होता. राजाराम कॉलेजमध्ये सर्व मुलींना त्यांनी मोफत शिक्षण दिले. रखमाबाई यांची मुलगी कृष्णाबाई यांना वैद्यकीय शिक्षणासाठी मदत करून मुंबई व परदेस शिक्षणासाठी मदत केली.

**अस्पृश्यांच्या शिक्षणासाठी प्रयत्न :**

छत्रपती शाहू महाराजांच्या काळामध्ये समाजामध्ये भेदभावाची भावना मोठ्या प्रमाणात होती. त्यामुळे त्यांनी अस्पृश्यांच्या मध्ये शिक्षण विषयक जागृती निर्माण केली व त्यांच्या शाळा व विद्यार्थ्यांची संख्या वाढवली. महाराजांनी दोन्ही समाजाला समान पातळीवर आणण्यासाठी व अस्पृश्य विद्यार्थ्यांना हायस्कूलच्या वर्गात जाण्यासाठी पात्रता निर्माण करण्यासाठी श्रीपतराव शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली खास वर्ग चालू करुन अस्पृश्य विद्यार्थ्यांचे शिक्षण पूर्णत्वास नेण्याचे प्रयत्न केले. या घटकातील विद्यार्थ्यांना महाराजांनी सढळ हस्ते मदत करून अनेक शिष्यवृत्ती दिल्या.

**वसतिगृहाची सोय :**

ग्रामीण भागातील बहुजन समाजातील विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची गैरसोय होऊ नये म्हणून त्यांच्या राहण्याच्या व जेवणाची व्यवस्था असणारी वस्तीग्रह काढली. त्यानंतर तेथे होणारी विद्यार्थ्यांची अडचण लक्षात घेऊन समाजातील सर्वच घटकासाठी स्वतंत्र वस्तीग्रह सुरू केले. केवळ गरिबीमुळे कोणीही शिक्षणापासून वंचित राहू नये. प्रत्येक जातीतील घटकाला शिक्षणाची संधी मिळाली पाहिजे शिक्षण हेच समाज परिवर्तनाचे साधन आहे असे त्यांना वाटत होते. म्हणून शाहू महाराजांनी अनेक वस्तीग्रह बांधली. त्यामुळे प्रत्येक जातीतील घटकाला स्वतःचा विकास करून घेण्याची संधी मिळाली.

**बहुजनांना नोकऱ्या :**

राजर्षी शाहू महाराजांनी बहुजनांना फक्त शिक्षण मिळवून दिलेले नाही तर स्वतंत्र जाहीरनाम्याने त्यांना नोकऱ्याही मिळवून दिलेल्या आहेत त्याविषयीच्या आदेशात स्पष्ट करून संपूर्ण बहुजन समाजाला त्यांनी नोकऱ्यात 50 टक्के आरक्षण मिळवून देऊन महत्वपूर्ण निर्णय घेतला. त्यामुळे सर्व सरकारी खात्यामध्ये बहुजन समाजाच्या विद्यार्थ्यांना स्थान मिळाले. हा त्यांचा महत्त्वपूर्ण निर्णय होता.

**सारांश:**

छत्रपती शाहू महाराजांच्या शैक्षणिक कार्याची व्यापक समाज शिक्षण हे महत्त्वाचे धोरण होते शिक्षणाच्या माध्यमातून बहुजन समाजातील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण देऊन सामान्य घटकाचे अन्याय दूर करावयाची त्यांची भूमिका होती. शिक्षणाचे महत्त्व माहित नसलेल्या घटकांमध्ये शिक्षणाविषयी आस्था निर्माण करणे हा हेतू त्यांचा होता. शिक्षणामुळे समाजाचा सर्वांगीण विकास होतो हे शिक्षणाचे महत्त्व राजर्षी शाहू महाराजांनी समाजाला पटवून देण्याचे कार्य केले आहे.

**संदर्भ ग्रंथ :**

1) डॉ. जयसिंगराव पवार, 'राजर्षी शाहू छत्रपती - जीवन कार्य', इतिहास प्रबोधनी कोल्हापूर 2012
2) पवार जयसिंगराव, 'राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ', महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी, कोल्हापूर 2007
3) धनंजय कीर, 'राजर्षी शाहू छत्रपती',पॉप्युलर प्रकाशन, मुंबई 2012
4) डॉ.नाईकवाडे, राजर्षी छत्रपती शाहू महाराज गौरव ग्रंथ, विद्याभारती प्रकाशन लातूर 2012
5) डॉ. नागोराव कुंभार, 'आरक्षण का व कसे', प्रबोधन प्रकाशन, लातूर फेब्रुवारी- 2007
6) प्रा.डॉ. उमेश मुंडे, 'राजर्षी शाहू महाराजांची प्रासंगिकता 21व्या शतकातील विचार', राजवीर प्रकाशन, परभणी 2013
7) डॉ. आलोक, 'राजर्षी शाहू महाराजांचे शिक्षण विषयक धोरण'
8) प्रा. नानासाहेब साळुंखे, 'शाहूच्या आठवणी', वृषाली प्रकाशन, कोल्हापूर 2009
9) प्रा. दिनेश मोरे, 'आधुनिक महाराष्ट्रातील परिवर्तनाचा इतिहास 1818—1960',के. एम. पब्लिकेशन पुणे- 2006